॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**विकास विभाग**

**जा.क्र.कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/१३७/२०२६** **दि.२७/०४/२०२६**

**अत्यंत महत्वाचे/ कालमर्यादित**

**प्रति,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी**
**संलग्नीत असलेल्या महाविद्यालयाचे मा. प्राचार्य तसेच**
**मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक यांना......**
**(शैक्षणिक अंकेक्षण न केलेले महाविद्यालये व परिसंस्था यांचे करिता)**

**विषय:** - शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या वर्षाचे शैक्षणिक अंकेक्षण न केलेल्या महाविद्यालये व परिसंस्था यांना शैक्षणिक अंकेक्षणासाठी एक संधी उपलब्ध करून देण्याबाबत.....

**संदर्भ:** -१) विद्यापीठाचे पत्र. जा. क्र. कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३५९/२०२५,दि.२२/११/२०२५.
२) विद्यापीठाचे पत्र. जा. क्र. कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३७६/२०२५,दि.०९/१२/२०२५.
३) विद्यापीठाचे पत्र. जा. क्र कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३७८/२०२५,दि.२२/१२/२०२५.
४) विद्यापीठाचे पत्र. जा. क्र. कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/०२/२०२६,दि.०२/०१/२०२६.
५) मा. अधिष्ठता मंडळाचा ठराव BOD-A-३२/२०२६,दि.०६/०४/२०२६.
६) मा. व्यवस्थापन परिषद ठराव No.C-५७/२०२६, दि.१७/०४/२०२६.
७) विद्यापीठाचे पत्र. जा. क्र. कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/११७/२०२६,दि.२२/०४/२०२६.

**महोदय/ महोदया,**

विद्यापीठाच्या वरील संदर्भीय १ ते ४ चे पत्राचे कृपया अवलोकन व्हावे सदर पत्रानुसार विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये,परिसंस्था तसेच स्वायत्त महाविद्यालये यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षाचे शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच शैक्षणिक अंकेक्षण करून घेण्यासाठी वेळोवेळी स्मरणपत्रे निर्गमीत करून मुदतवाढ सुध्दा देण्यात आलेली होती.

ज्या महाविद्यालयांनी/परिसंस्थानी शैक्षणिक अंकेक्षण करण्यासाठी ऑनलाईन प्रस्ताव सादर केलेले होते. अशा १५७ महाविद्यालयांची /परिसंस्थाची यादी वरील संदर्भीय क्र. ७ नुसार विद्यापीठा च्या संकेतस्थळावर श्रेणीचा (Grade) प्रसिध्द करण्यात आली आहे. ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या प्रस्तावांची गुणदान व श्रेणी देण्यासाठी मा.कुलगुरू महोदयांनी गठीत केलेल्या समितीच्या दि. ६ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या सभेत इतिवृतातील शिफारस क्र. ५ मध्ये **"विद्यापीठाने वारंवार आवाहन करूनही मुदतीत ज्या महाविद्यालयांनी/परिसंस्थानी शैक्षणिक अंकेक्षणासाठी ऑनलाईन/ऑफलाईन प्रस्ताव विद्यापीठास सादर केलेले नाहीत, अशा महाविद्यालयांना शैक्षणिक अंकेक्षण विद्यापीठ कायद्यानुसार बंधनकारक असल्यांने त्यांना पुन:श्च एक संधी देण्यात यावी मात्र त्यासाठी संबधित महाविद्यालये/परिसंस्था यांचेकडून पूर्वी ठरवून दिलेले शुल्क रू ६०००/- आणि नव्याने प्रस्ताव सादर करण्यासाठी विलंब शुल्क रू ३०००/- अशी एकूण रू ९०००/- शुल्क आकारण्यात यावे.** अशी शिफारस केलेली आहे. सदर इतिवृत्तास मा. अधिष्ठता मंडळ आणि मा. व्यवस्थापन परिषदेने मान्यता प्रदान केलेली आहे.

तेव्हा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाशी संलग्नित महाविद्यालयांना/परिसंस्थाना याद्वारे सुचित करण्यात येते की, ज्या महाविद्यालयांना/परिसंस्थाना विद्यापिठ संलग्नता प्रदान देवून पाच वर्ष कालावधी झालेले आहेत. आणि शैक्षणिक अंकेक्षण पात्र असुनही शैक्षणिक अंकेक्षण केलेले नाहीत. अशा महाविद्यालये/परिसंस्था यांना शैक्षणिक अंकेक्षण करून घेण्यासाठी एक संधी देण्यात येत आहे. सदर महाविद्यालयांनी ऑनलाईन परिपत्रके पाहून विद्यापिठाच्या पोर्टलवर(Login) प्रस्ताव **दि.११/०५/२०२६** पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत. ऑनलाईन प्रस्तावासाठी सविस्तर माहिती कृपया यापूर्वी निर्गमित केलेल्या पत्रांचे अवलोकन करण्यात यावे. महाविद्यालये/परिसंस्था यांनी आपले आधिनस्त प्राध्यापंकाकडून प्रस्ताव बिनचूक भरून घ्यावा व सदर प्रस्तावाचे ऑनलाईन भरलेल्या प्रस्तावाची प्रिंट व भरलेल्या रक्कमेची पावती व आवश्यक दस्ताऐवज हार्ड कॉपीसह विद्यापिठास **दि.१४/०५/२०२६** पर्यत न चुकता सादर करावे ही विनंती.

## विकास विभाग

यानंतरचे जे महाविद्यालये शैक्षणिक अंकेक्षण करणार नाहीत. अशा महाविद्यालयांची/परिसंस्थाची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापिठ अधिनियम २०१६ मधील नमूद तरतुदीनुसार संलग्नता काढून घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. याची कृपया नोंद घेण्यात यावी. तसेच स्थानिक चौकशी समिती च्या अहवालात शैक्षणिक अंकेक्षणाची श्रेणी नमूद करण्यात आलेली असल्याने सदर बाब स्थानिक चौकशी समितीच्या वेळोवेळी निदर्शनास आणून द्यावे. तसेच ज्या महाविद्यालयांना/परिसंस्थाना शैक्षणिक अंकेक्षण जाहिर करण्यात आले आहे. त्या महाविद्यालयांनी/परिसंस्थानी पुन:श्च प्रस्ताव सादर करू नये.अशा प्रस्तावावर कुठलेही कार्यवाही केली जाणार नाही व असे प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.कृपया विद्यापिठाचे परिपत्रकाचे अवलोकन करून ऑनलाईन प्रस्ताव भरण्याची कार्यवाही तात्काळ करावी ही विनंती.

आपला विश्वासू

(प्रवीण चंदनकर)
सहा.कुलसचिव
विकास विभाग

प्रत माहितीसाठी सादर: -

१. मा. कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
२. मा. प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
३. मा. कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
४. मा. वित्त व लेखा अधिकारी कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
५. मा.संचालक/विभाग प्रमुख,संगणक प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

प्रत : -

**मा.उपकुलसचिव संलग्नता,** कृपया स्थानिक चौकशी समितीच्या ऑनलाईन फॉर्म (LIC) मध्ये शैक्षणिक अंकेक्षण श्रेणी (Academic Audit) चा समावेश करण्यात यावा.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

**विकास विभाग**

**जा.क्रं./कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३५९/२०२५** **दि.२४/११/२०२५**

**अत्यंत महत्वाचे/ कालमर्यादित**

**प्रति,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी**
**संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयाचे मा. प्राचार्य तसेच**
**मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक यांना......**

**विषय :-** विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयांचे व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करणे संदर्भात.....

**महोदय/ महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विदित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ३७(ञ) व ११७ (१) नुसार विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा यांचे तीन वर्षातुन किमान एकदा शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करून घेणे आवश्यक व बंधनकारक आहे.

तेव्हा, यासंदर्भात विद्यापीठाच्या मा. व्यवस्थापन परिषद सभेने पारित केलेला ठरावाच्या अनुषंगाने आणि प्राप्त झालेल्या आदेशावरून आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ मधील आपल्या महाविद्यालयातील/ परिसंस्थेतील योग्य ती माहिती विहित नमुन्यात Online व्दारे भरावयाची आहे तसेच आपल्या महाविद्यालयांचे/ परिसंस्थेचे शैक्षणिक अंकेक्षण करण्यासाठी विद्यापीठाच्या **www.nmu.ac.in** या संकेतस्थळावर Portal Login करून online माहिती भरण्यात यावी. संपुर्ण माहिती भरल्यानंतर शैक्षणिक अंकेक्षण शुल्क रुपये ६०००/-(रू. सहा हजार) online paid करावे, त्यानंतर महाविद्यालयाचे certificate तयार होईल त्या प्रमाणपत्रावर मा. प्राचार्य यांच्या स्वाक्षरी आणि शिक्का, रुपये ६०००/- पावतीची प्रिंटसह Hard Copy विद्यापीठात दि.१०/१२/२०२५ पर्यंत जमा करावी, ही विनंती.

**आपल्या महाविद्यालयास Portal login करण्यासाठी स्वतंत्र पत्र (ई-मेलव्दारे किंवा पत्राव्दारे) विद्यापीठाकडुन User Name व Pass code कळविण्यात येत आहे.** तसेच आपणास काही तांत्रीक अडचणी असल्यास कृपया **support@nmu.ac.in** किंवा ०२५७-२२५७४५३ या दुरध्वनीवरून संपर्क साधु शकतात, तसेच नमुना व माहीती भरण्यासंबंधी काही अडचणी असल्यास **development@nmu.ac.in** ई-मेल करावा किंवा ०२५७-२२५७२२५ वर संपर्क साधावा, ही विनंती.

आपला विश्वासू

(प्रवीण चंदनकर)
सहा.कुलसचिव (अ.का.)
विकास विभाग

**प्रत माहितीसाठी सादर**:-

१. मा.कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
२. मा.प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
३. मा.संचालक, आय. क्यु. ए. सी. विभाग, कबचौउमवि, जळगाव
४. मा.पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

**विकास विभाग**

**जा.क्रं./कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३७६/२०२५** **दि.०९/१२/२०२५**

**अत्यंत महत्वाचे/ कालमर्यादित**

**प्रति,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी**
**संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयाचे मा. प्राचार्य तसेच**
**मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक यांना......**

**विषय :-** विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालये व मान्यताप्राप्त स्वायत्त महाविद्यालये /परिसंस्थांचे शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करणे संदर्भात मुदतवाढ देण्याबाबत.....

**संदर्भ :-** विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३५९/२०२५, दि.२४/११/२०२५.

**महोदय/ महोदया,**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ३७(ञ) व ११७ (१) मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांचे/ परिसंस्था तसेच स्वायत्त महाविद्यालये/ परिसंस्थांचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीतील शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) योग्यती माहिती विहीत नमुन्यात Online व्दारे भरण्याबाबत संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात आले आहे. तसेच संपूर्ण माहीती भरतांना शैक्षणिक अंकेक्षण शुल्क भरल्यानंतर महाविद्यालयांने Certificate वर प्राचार्यांची स्वाक्षरी घेऊन फी भरल्याच्या पावतीसह Hard Copy विद्यापीठात दि.१०/१२/२०२५ पर्यंत जमा करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तथापी काही महाविद्यालये/ परिसंस्था यांनी मेल व्दारे व काही महाविद्यालयांनी दुरध्वनी व्दारे विद्यापीठाकडे संपर्क करून माहीती भरण्यास तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे मुदतवाढ मिळण्याबाबत मागणी करण्यात येत आहे. सदर बाब लक्षात घेता, शैक्षणिक अंकेक्षणाची माहीती भरण्यासाठी **दि.२२/१२/२०२५ पर्यंत** मुदत वाढ देण्यात येत आहे. विद्यापीठात माहिती पाठवितांना त्यासोबत अनुक्रमणिका (Index) तयार करुन कागदपत्रांना नंबरींग करुन त्याची माहीती अनुक्रमणिकेत त्या त्या मुद्यासमोर पेज नंबर नमुद करुन अपलोड केलेल्या कागदपत्रांसह परिपुर्ण माहिती पाठवावी, ही विनंती.

तसेच आपणास काही तांत्रीक अडचणी असल्यास त्याचा Screenshot कृपया **support@nmu.ac.in** ई-मेलवर पाठवावा. किंवा ०२५७-२२५७४५३ या दुरध्वनीवरून संपर्क साधु शकतात, तसेच विहीत नमुना व माहीती भरण्यासंबंधी काही अडचणी असल्यास **development@nmu.ac.in** ई-मेल करावा किंवा ०२५७-२२५७२२५ वर संपर्क साधावा, ही विनंती.

आपला विश्वासू

(प्रवीण चंदनकर)
सहा.कुलसचिव (अ.का.)
विकास विभाग

**प्रत माहितीसाठी सादर:-**

१. मा.कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
२. मा.प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
३. मा.संचालक, आय. क्यु. ए. सी. विभाग, कबचौउमवि, जळगाव
४. मा.पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
**विकास विभाग**

**जा.क्रं./कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३७८/२०२५** **दि.२२/१२/२०२५**

**अत्यंत महत्वाचे/ कालमर्यादित**

**प्रति,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी**
**संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयाचे मा. प्राचार्य तसेच**
**मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक यांना......**

**विषय :-** विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालये व मान्यताप्राप्त स्वायत्त महाविद्यालये /परिसंस्थांचे शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करणे संदर्भात मुदतवाढ देण्याबाबत.....

**संदर्भ :-** १) विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३५९/२०२५, दि.२४/११/२०२५.
२) विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३७६/२०२५, दि.०९/१२/२०२५.

**महोदय/ महोदया,**

विद्यापीठाच्या वरील संदर्भिय क्र.१ च्या पत्रानुसार विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालये तसेच मान्यताप्राप्त स्वायत्त महाविद्यालये /परिसंस्थांचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीतील शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करण्याबाबत दि.१०/१२/२०२५ पर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे कळविण्यात आले होते. तथापी ऑनलाईन माहिती भरण्यास महाविद्यालयांना/ परिसंस्थांना तांत्रिक अडचण निर्माण होत असल्याने माहिती भरण्यास व प्रस्ताव सादर करण्यासाठी विद्यापीठाने वरील संदर्भिय क्र. २ च्या पत्रानुसार दि.२२/१२/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती परंतु मुदतवाढ देवूनही फक्त १०९ महाविद्यालयांनी/ परिसंस्थांनी प्रस्ताव विद्यापीठास सादर केलेले आहे. तरीही बऱ्याच महाविद्यालयांनी ऑनलाईन माहिती भरुन प्रस्ताव विद्यापीठास सादर केलेले नाहीत. सदर बाब ही अत्यंत गंभीर असुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ३७(ञ) व ११७ (१) मध्ये नमूद केलेल्या तरतुदींच्या उल्लंघन करणारे आहे.

यापत्राव्दारे अवगत करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ३७(ञ) व ११७ (१) मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार विद्याविषयक लेखापरिक्षा पध्दतीने महाविद्यालयांचे संलग्नीकरण चालू ठेवण्यावर आणि परिसंस्था मान्यता चालु ठेवण्यासाठी संलग्नीत महाविद्यालयांची व परिसंस्थांनी वरील कालावधीत ऑनलाईन माहिती भरुन शैक्षणिक अंकेक्षणासाठी प्रस्ताव निर्धारीत वेळेत सादर करणे बंधनकारक आहे. याची गांभीर्याने नोंद घ्यावी, ही विनंती.

ज्या महाविद्यालयांनी ऑनलाईन माहिती भरुन प्रस्ताव सादर केलेले नाहीत अशा महाविद्यालयांना **दि.३१/१२/२०२५** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. यानंतर कुठल्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही याची कृपया नोंद घेवुन संदर्भ क्र. १ व २ मध्ये नमुद केलेल्या पत्रातील सुचनेनुसार ऑनलाईन माहिती भरुन हार्ड कॉपी सह प्रस्ताव फाईलमध्ये सादर करावे.

तसेच आपणास काही तांत्रीक अडचणी असल्यास त्याचा Screenshot कृपया **support@nmu.ac.in** ई-मेलवर पाठवावा. किंवा ०२५७-२२५७४५३ या दुरध्वनीवरून संपर्क साधु शकतात, तसेच विहीत नमुना व माहीती भरण्यासंबंधी काही अडचणी असल्यास **development@nmu.ac.in** ई-मेल करावा किंवा ०२५७-२२५७२२५ वर संपर्क साधावा, ही विनंती.

आपला विश्वासू

(प्रवीण चंदनकर)
सहा.कुलसचिव (अ.का.)
विकास विभाग

**प्रत माहितीसाठी सादर:-**

१. मा.कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
२. मा.प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
३. मा.संचालक, आय. क्यु. ए. सी. विभाग, कबचौउमवि, जळगाव
४. मा.पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

**विकास विभाग**

**जा.क्रं./कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/०२/२०२६** **दि.०२/०१/२०२६**

## अंतिम मुदतवाढ

**प्रति,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी**
**संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयाचे मा. प्राचार्य तसेच**
**मान्यताप्राप्त स्वायत्त महाविद्यालये /परिसंस्थांचे मा.संचालक यांना......**

**विषय :-** विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालये व मान्यताप्राप्त स्वायत्त महाविद्यालये /परिसंस्थांचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या वर्षाचे शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करण्यासाठी अंतीम मुदतवाढ देण्याबाबत.....

**संदर्भ :-** १) विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३५९/२०२५, दि.२४/११/२०२५.
२) विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३७६/२०२५, दि.०९/१२/२०२५.
३) विद्यापीठाचे पत्र जा.क्रं./कबचौउमवि/११ए/शैक्षणिक अंकेक्षण/३७८/२०२५, दि.२२/१२/२०२५.

**महोदय/ महोदया,**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ३७(ज) व ११७ (१) मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांचे/ परिसंस्था तसेच स्वायत्त महाविद्यालये/ परिसंस्थांचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीतील शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit) करण्यासाठी दि.२४/११/२०२५ रोजीच्या पत्रानुसार ऑनलाईन माहिती सादर करयासाठी दि.१०/१२/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर ऑनलाईन माहिती भरण्यास महाविद्यालये/ परिसंस्थाना तांत्रिक अडचण येत असल्याने माहिती भरण्यासाठी आणि प्रस्ताव सादर करण्यासाठी अनुक्रमे दि.२२/१२/२०२५ व दि.३१/१२/२०२५ असे दोन वेळा मुदत देण्यात आली होती. विद्यापीठाने दोनवेळा मुदतवाढ देवून दि.३१/१२/२०२५ पर्यंत **१५०** एवढ्या महाविद्यालयांनी/परिसंस्था/ स्वायतदर्जा प्राप्त महाविद्यालयांनी ऑनलाईन माहिती भरून प्रत्यक्ष प्रस्ताव विद्यापीठास सादर केलेली आहेत.

विद्यापीठाने वेळोवेळी मुदतवाढ देवून सुध्दा शैक्षणिक अंकेक्षणासाठी अजूनही बऱ्याच महाविद्यालये/ परिसंस्थांनी ऑनलाईन माहिती भरुन प्रस्ताव सादर केलेली नाहीत. अशा महाविद्यालयांना शेवटची संधी म्हणून **दि.१०/०१/२०२६ पर्यंत** मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानंतर माहिती व प्रस्ताव सादर करण्यासाठी दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

ऑनलाईन माहिती भरण्यासाठी विद्यापीठाने यापुर्वी निर्गमी केलेले संदर्भ क्र. १ ते ३ चे कृपया अवलोकन करावे व त्यानुसार प्रस्ताव निर्धारित वेळेत विद्यापीठास सादर करण्यात यावे, ही विनंती.

आपला विश्वासू

(प्रवीण चंदनकर)
सहा.कुलसचिव (अ.का.)
विकास विभाग

**प्रत माहितीसाठी सादरः-**

१. मा.कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
२. मा.प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
३. मा.संचालक, आय. क्यु. ए. सी. विभाग, कबचौउमवि, जळगाव
४. मा.पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव